पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या संदेशावर आधारीत :-

# शूर जवानांनो!

शूर जवानांनो! लढा, लढा, निधडया छातीने।
विजयश्री वरणार तुम्हाला।
तव शौर्याचे अन् कीर्तिचे।
युगे युगे गातील पवाडे। भाग्य तरी केव्हढे ॥ धृ.॥ युगे...
हिमगिरीहून उत्तुंग धडाडी
हिमतीला नभ सीमा थोडी
वामनमूर्ति नॅट्स् केव्हढी
सेबरजेट्सची केली चिंधडी
मिराज तीनची केली चिंधडी
धनाजीच्या/संताजीच्या पराक्रमाची याद आम्हाला घडे ॥१॥ युगे...
पॅटन (शेरमन) असो वा चिनी रणगाडे
रडगाड्यांची गाडिली हाडे
खडे चारिले चित चाऱ्ही मुंडे
थडग्यामध्ये पॅटन घाली तोंडामध्ये बोटे ॥2॥ युगे...
नौदलाची नौबत झडे
शत्रूदलाच्या गुहेत धडके
अन् मोडी त्यांचे कंबरडे
खैबर अन् गाझीचे नरडे
शहाजहाँचे घोटी नरडे
विनाशिकेचे (पाणबुडीचे) घोटी नरडे
मर्दुमकीला तोड कुठे या! नतमस्तक ती पुढे ॥3॥ युगे...

(१९६६)